१००६ सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल/वार्तांकन.[१९५५]

या बाबीमध्ये

23 नोव्हेंबर,१९५५

डी. सर्वोच्च न्यायालयाचे वकीलाचे प्रकरणात-

[मा.मुख्य न्यायमूर्ती बी. के. मुखर्जी, न्यायमूर्ती एस. आर. दास आणि वेंकटरामा अय्यर यांचे समक्ष-

बार कौन्सिल कायदा-व्यावसायिक अधिकारक्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षमतेत चुकीचे वर्तन-बार कौन्सिल कायदा (१९२६ चा XXXVIII), कलम-१०-सर्वोच्च न्यायालयाचे नियम, आदेश चौथा, नियम ३०,बार कौन्सिल कायद्याचे कलम १० न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात केवळ व्यावसायिक गैरवर्तनासाठीच नव्हे तर इतर कोणत्याही क्षमतेत केलेल्या इतर कोणत्याही गैरवर्तनासाठी वकीलांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची परवानगी देते आणि कोणत्याही योग्य प्रकरणात योग्य वाटेल अशी कारवाई करणे, हे न्यायालयाच्या विवेकबुद्धीवर सोडते.

मुंबईचे महाधिवक्ता वि. तीन वकीलांचे प्रकरण ([१९३४] आय. एल. आर. ५९ बॉम. ५७), वकिलाच्या बाबतीत ([१९३६] आय. एल. आर. ६३ कॅल. ८६७) आणि इन रि अ प्लीडर (आय. एल. आर. [१९४३] मद्रा. ५९५), इ.निकाल संदर्भासाठी विचारात घेतले.रि थॉमस जेम्स वॉलेस ([१८६६] एल. आर. १ पी. सी. २८३) आणि रि

बनारसचे वकीलांचे प्रकरण (ए. आय. आर. [१९३२] सर्व. ४९२), लागू करण्या योग्य नाही,असे म्हटले.

परिणामतः मुंबई प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत एका खटल्यात आरोपी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वकीलांनी खटल्याच्या दंडाधिकाऱ्यांशी सातत्याने असभ्य वर्तन केले आणि त्यांचा अवमान केला आणि खटला पुढे ढकलण्यासाठी आणि न्यायालयाच्या प्रशासनाला अवमानात आणण्यासाठी आपल्या अधिकारात सर्व काही केले, अशा खटल्यात तो गैरवर्तणुकीचा दोषी ठरला आणि त्यामुळे त्याला कामावरून निलंबित केले जाऊ शकते,असा निष्कर्ष काढला.

डी.व्यक्तिशः/स्वतः

न्यायमित्र म्हणून भारताचे महाधिवक्ता एम. सी. सेटलवाड.

न्यायालयाने हा निर्णय २३ नोव्हेंबर,१९५५ रोजी न्यायमूर्ती दास यांच्या हस्ते पारीत केला.

सदर आदेश सर्वोच्च न्यायालयाने न्यायनिर्णय आदेश-४, न्यायनिर्णय नियम- 30 अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाकडून अहवाल मिळाल्यानंतर कारणे दाखवा नोटिस पाठवून जारी केला होता, दिवाणी अर्ज क्रमांक १५०६ मध्ये १३ ऑक्टोबर १९५५ रोजी दिलेल्या आदेशाद्वारे, उत्तरवादी वकिलाला उक्त आदेशाच्या तारखेपासून एका वर्षाच्या कालावधीसाठी सदर उच्च न्यायालयात वकील म्हणून काम करण्यापासून निलंबित केले होते.वर नमूद केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालात आणि आदेशात निर्दिष्ट केलेले प्रकरण लक्षात घेता, या न्यायालयाने उत्तरवादी विरुद्ध शिस्तभंगाची किंवा अन्य प्रकारची योग्य कारवाई का करू नये, याचे कारण

दर्शविण्यासाठी नियमांनुसार नोटीस बजावली असल्याने, उत्तरवादी ने त्या नोटीसला प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

उत्तरवादी हा मुंबई उच्च न्यायालयातील बऱ्यापैकी अनुभव असलेला वकील आहे आणि त्यामुळे त्याची सर्वोच्च न्यायालयातील वकील म्हणूनही नोंदणी झाली होती.असे दिसते की, १९५३ वर्षाच्या सुरुवातीच्या काळात सदर वकीलास मुंबईतील प्रेसिडेन्सी दंडाधिकाऱ्यांपैकी एक असलेले, श्री. सोनावणे साहेबांच्या समोर मुंबई प्रतिबंधात्मक कायद्याच्या अंतर्गत गुन्हा केला असल्याच्या आरोपाखाली खटला चालवण्यात आला होता. हा खटला जुलै १९५३ ते नोव्हेंबर १९५३ पर्यंत चालला.१८ नोव्हेंबर १९५३ रोजी दंडाधिकाऱ्यांनी सदर वकीलास, त्याच्यावर ज्या गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात आला होता, त्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवले आणि त्याला एक महिन्यासाठी कठोर कारावासाची आणि २०१ रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आणि दंड न भरल्यास चार आठवड्यांच्या कठोर कारावासाची शिक्षा सुनावली.या निकाला विरुद्ध सदर वकीलाने उच्च न्यायालयात (अपील) याचिका दाखल केली.२४ फेब्रुवारी १९५४ रोजी उच्च न्यायालयाने उत्तरवादीची दोषसिद्धी कायम ठेवली परंतु; शिक्षेत बदल करून एक हजार रुपये दंड ठोठावला आणि त्या अनुषंगाने कठोर कारावासाची शिक्षा कमी केली.दरम्यान २५ नोव्हेंबर, १९५३ रोजी ट्रायल मॅजिस्ट्रेट श्री. सोनावणे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील बाजूच्या प्रबंधकांना त्यांच्यासमोर आरोपी म्हणून प्रत्यक्ष हजर झालेल्या वकीलाचे वर्तनाबाबत अहवाल दिला. त्या अहवालाच्या अवलोकनानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या माननीय मुख्य न्यायमूर्तींनी वकीलाचे वर्तनाची चौकशी करण्यासाठी बार कौन्सिलच्या तीन सदस्यांचा समावेश असलेल्या

न्यायाधिकरणाची स्थापना केली. न्यायाधिकरणाने समन्स जारी केले,ज्यामध्ये सूचीत केले होते की,त्याच्या वर्तनाची खाली नमूद मुद्यांबाबत चौकशी केली जाईल.ते मुद्दे असे-

(1) श्री. टी. ए. सोनावणे, बी. ए., एल. एल. बी., प्रेसिडेन्सी दंडाधिकारी, 18 वे न्यायालय, गिरगाव, मुंबई, यांचा २५ नोव्हेंबर १९५३ रोजीचा अहवाल, जो त्यांनी खटला चालवलेल्या १९५३ च्या प्रकरण क्रमांक ५९३/पी च्या संदर्भात, उच्च न्यायालय, अपीलीय बाजू, मुंबई उच्च न्यायालयाचे प्रबंधक यांना सादर केला होता, आणि-

(ब) १९५३ च्या फौजदारी अपील क्रमांक १५३२ मध्ये (१९५३ च्या फौजदारी अपील क्रमांक १५६४ सह) मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय, ज्यात उपरोक्त प्रकरणात उपरोक्त विद्वान दंडाधिकाऱ्यांनी त्यांच्याविरुद्ध दिलेला निकाल आणि दोषसिद्धीचा आदेश कायम ठेवला होता.या प्रकरणी असे दिसते की, वारंवार आक्षेप घेतल्यामुळे आणि उत्तरवादीने सतत दाखल केलेल्या याचिकांमुळे, कार्यवाही काहीशी लांबली होती, परंतु अखेरीस १६ मार्च १९५५ रोजी किंवा त्या सुमारास उत्तरवादीने बार कौन्सिल न्यायाधिकरणाच्या सचिवांकडे, त्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रबंधकांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत पाठवली आणि न्यायाधिकरणाला कळविले की, त्याच्या विरोधात लावलेल्या आरोप त्यास कबूल आहेत. त्या संदर्भात त्याने आरोप कबूल असल्या बाबत, उच्च न्यायालयाला अहवाल पाठविण्याची विनंती केली.न्यायाधिकरणाचा वेळ वाया घालवल्याबद्दल खेद व्यक्त करून त्यांनी पत्राचा समारोप केला.उच्च न्यायालयाच्या प्रबंधकांना लिहिलेल्या पत्रात उत्तरवादीने नमूद केले आहे की, न्यायाधिकरणा समोरच्या कार्यवाहीचा कायदेशीर रित्या चुकीचा अर्थ लावला गेला, असा त्यांचा युक्तिवाद बिनशर्त मागे घेऊन, स्वतंत्र लेखी माफीनामा सोबत जोडला आहे आणि हे प्रकरण बार कौन्सिल

न्यायाधिकरणाकडे पाठविण्याचा उच्च न्यायालयाला कायदेशीररित्या पूर्ण अधिकार आहे हे ही मान्य केले आणि पुढे स्पष्ट केले की, श्री. सोनावणे यांनी त्यांच्या अहवालात केलेली विधाने त्यात निर्दिष्ट केलेल्या दोन बाबींव्यतिरिक्त खरी होती.२८ मार्च १९५५ रोजी उत्तरवादीने त्याचे माफीनामा स्पष्ट करणारे पूर्वीचे स्पष्टीकरण आणि पूरक असा अतिरिक्त जबाब सादर केला.त्यानंतर न्यायाधिकरणाने उच्च न्यायालयाला अहवाल सादर केला.या अहवालाद्वारे न्यायाधिकरणाने उत्तरवादीच्या स्वतःच्या कबुली जवाबानुसार, श्री. सोनावणे यांच्या अहवालातील आरोप, त्याच्या विरुध्द सिद्ध झाले आहेत आणि उत्तरवादीच्या वर्तनाची अत्यंत गंभीर दखल घेतली जावी, अशी शिफारस केली.समन्समधील दुसऱ्या मुद्द्याच्या संदर्भात न्यायाधिकरणाने असे म्हटले आहे की, प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत उत्तरवादी ला केवळ दोषी ठरविणे, म्हणजे ती व्यावसायिक गैरवर्तणूक किंवा इतर गैरवर्तणूक नव्हे.त्यामुळे, न्यायाधिकरणाने उत्तरवादीला भारतीय बार कौन्सिल कायद्याच्या कलम 10 अंतर्गत व्यावसायिक किंवा इतर गैरवर्तनासाठी निर्दोष ठरविले आणि म्हणून, उत्तरवादी त्या आरोपात न्यायाधिकरणाला दोषी आढळले नाही.त्या अहवालाच्या अवलोकनानंतर उच्च न्यायालयाने उत्तरवादी ला अंतीम सुनावणीसाठी नोटीस बजावली.हे प्रकरण १३ ऑक्टोबर १९५५ रोजी मुख्य न्यायाधीश आणि न्यायमूर्ती तेंडुलकर यांच्या खंडपीठासमोर अंतीम निकालासाठी आले.उत्तरवादी च्या तर्फे असलेल्या विद्वान वकिलांनी उत्तरवादी च्या वतीने बिनशर्त आणि विनाअट माफी मागितली आणि विनंती केली की, जर न्यायालयाने मात्र उत्तरवादी ला नुसती ताकीद दिली, तर न्यायाची उद्दिष्टे पूर्ण होतील. न्यायाधिकरणाच्या अहवालाचा विचार केल्यानंतर, उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, उत्तरवादीचे गैरवर्तन इतके गंभीर होते की, त्याला अद्दल घडेल अशीच शिक्षा ठोठावली गेली पाहिजे. त्यानुसार, सर्वकाही बाबी विचारात घेऊन, उच्च न्यायालयाने

उत्तरवादीला त्या आदेशाच्या तारखेपासून एका वर्षाच्या कालावधीसाठी वकीली करण्यापासून निलंबित केले.या न्यायालयात अपील करण्यासाठी योग्यतेच्या प्रमाणपत्रासाठी चा उत्तरवादीचा अर्ज नाकारला गेल्याने, त्याने आमच्यासमोर अपील करण्यासाठी विशेष अनुमती याचिका दाखल केली.मात्र, ती याचिका आम्ही फेटाळली आहे.त्यामुळे, आता शिस्तभंगाच्या कारवाईचा विषय तेवढा हाताळायचा आहे.

कारणे दाखवा नोटीस च्या अनुषंगाने, उत्तरवादी ने कारण दाखवून याचिका दाखल केली आहे.त्या याचिकेचा परिच्छेद ७ खालीलप्रमाणे आहेः-

"७. १८व्या न्यायालयाच्या विद्वान प्रेसिडेन्सी दंडाधिकाऱ्याचा अहवाल हा खटल्याच्या सुनावणीदरम्यान घडलेल्या कट कारस्थानांचा अतिशयोक्तीपूर्ण, विकृत आणि उघड उघड चुकीचा वृतांत आहे आणि ज्या परिस्थितीत याचिकाकर्त्याला कमी-अधिक प्रमाणात अपमानास्पद माफी मागण्यास भाग पाडले गेले होते, त्या परिस्थितीचा विचार करून, माननीय न्यायालयाने, या प्रकरणाची योग्य चौकशी करावी किंवा न्यायालयाच्या निर्देशानुसार चौकशी चे आदेश द्यावेत.

आमच्यासमोर प्रत्यक्ष हजर होऊन उत्तरवादीने स्वतः काहीसा जोरदार असा युक्तिवाद केला आहे की, न्यायाधिकरणासमोर त्याची कोणतीही न्याय्य चौकशी झाली नव्हती.त्याच्या गैरवर्तनाची जी तक्रार करण्यात आली होती, त्याबद्दल चौकशी करण्याचा न्यायाधिकरणाला अधिकारच नाही.कारण, सदर प्रकरणी त्यांना वकील म्हणून त्यांना नेमलेलेच नव्हते,वचनबद्ध केले नव्हते. कारण, खटल्यातील आरोपी म्हणून डी. वकील स्वतः हजर झाले होते. न्यायाधिकरणाने एका टप्प्यावर असे म्हटले होते की, न्यायाधिकरणाला अधिकारक्षेत्रच नाही,

परंतु; या मुद्यावर त्यांचे उपस्थितीत आणि म्हणणे ऐकून न घेताच निर्णय घेण्यास नकार दिला होता. तसेच, न्यायाधिकरण कोणताही औपचारिक आरोप निश्चित करण्यात अयशस्वी ठरले, आणि त्यांनी अधिकारक्षेत्राच्या अभावामुळे कार्यवाही रद्द करण्यासाठी अनुच्छेद २२७ अंतर्गत उच्च न्यायालयात अर्ज केला होता, परंतु उच्च न्यायालयाने तो अर्ज फेटाळला होता आणि या न्यायालयात अपील करण्यासाठी त्याला योग्यतेचे प्रमाणपत्र देण्यास नकार दिला होता या आणि अशाच इतर अनेक बाबींकडे लक्ष वेधले, ज्यावरुन न्यायाधिकरणाची कारवाई ही एकतर्फी,पूर्वग्रह दूषित आणि पक्षपाती होती असे म्हणता येईल.

उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय आणि आदेश यांच्याविरुद्ध अपील करण्यासाठी विशेष परवानगीसाठी केलेला त्यांचा अर्ज फेटाळला गेल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने, वरिष्ठ वकील श्री. जी. यांच्या बाबतीत या न्यायालयाने केलेल्या निरीक्षणानुसार,[(१)[१९५५]१एस.सी.आर.४९०-४९५.] कारणे दाखवा नोटीसच्या सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयातील किंवा बार कौन्सिलच्या न्यायाधिकरणासमोरच्या सुनावणीत काय झाले होते, हा विषय इथे संबंधीत नाही, ही बाब आम्ही उत्तरवादीच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर उत्तरवादी, वर उद्धृत केलेल्या त्याच्या याचिकेच्या परिच्छेद ७ वर परत आला आणि त्याने या न्यायालयाला या प्रकरणाची नव्याने चौकशी करण्याची विनंती केली.येथे जारी केलेल्या नोटीसीत उल्लेख केलेल्या मुंबई उच्च न्यायनिर्णय निकालावरून असे दिसते की, उत्तरवादीने, श्री. सोनावणे यांच्या अहवालातील केवळ दोन बाबी वगळता, सर्व गोष्टींचे सत्य मान्य केले होते.हा अहवाल म्हणजे, खटल्याच्या सुनावणीदरम्यान घडलेल्या घटनांची अतिशयोक्तीपूर्ण, विकृत आणि उघड उघड चुकीचा वृत्तांत आहे, या अस्पष्ट आरोपाव्यतिरिक्त,उत्तरवादी आपल्या सध्याच्या याचिकेत तो

अहवाल अतिशयोक्तीपूर्ण, विकृत किंवा आक्षेपार्ह असल्याचे दाखवून देणाऱ्या कोणत्याही विशिष्ट जबाबाचा संदर्भ देऊ शकलेला नाही.श्री. सोनावणे यांच्या अहवालातील विधानांच्या सत्यतेची त्यांनी बिनशर्त कबुली दिल्यामुळे, त्यांच्या याचिकेच्या परिच्छेद ७ मध्ये आढळणाऱ्या अशा अस्पष्ट आरोपांवर आम्ही त्यांना परत जाण्याची परवानगी देण्यास तयार नाही.उच्च न्यायालयाचे आणि या न्यायालयाचे वकील म्हणून जवाबदारीचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीला न्यायालयाशी निष्काळजीपणे वागण्याची, जे या प्रकरणात या वकिलाने केले आहे, त्याची परवानगी देता येऊ शकत नाही, यावर आम्ही भर देण्याची गरज नाही. त्यांनी अहवालाची अचूकता मान्य केली, आपला गुन्हा कबूल केला आणि केवळ माफीनामा देऊन त्यातून बाहेर पडता येईल या आशेने बिनशर्त माफी मागितली.हे डावपेच उच्च न्यायालयात काम करू शकले नाहीत, हे लक्षात आल्यावर आता चौकशीची मागणी करून,त्यांना त्यांचे डावपेच बदलायचे आहेत, जी चौकशी त्यांनी स्वतः कबुली देऊन आणि माफी मागून टाळली होती.उत्तरवादींना तसे करण्याची परवानगी देण्याची आमची मुळीच तयारी नाही.आम्ही श्री. सोनावणे यांचा अहवाल काळजीपूर्वक पाहिला आहे आणि तो अहवाल अत्यंत दुःखद आहे, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. तेव्हा आम्ही त्याच्याशी पूर्णपणे सहमत आहोत.उच्च न्यायालयाने निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे, फौजदारी खटल्यातील उत्तरवादी चे वर्तन कोणत्याही मानकांनुसार पूर्णपणे अक्षम्य होते.दंडाधिकाऱ्यांशी असभ्यपणे वागण्याचा आणि त्यांचा अवमान करण्याचा, खटला पुढे ढकलण्याचा आणि न्यायाच्या प्रशासनाला अवमानात आणण्यासाठी आपल्या अधिकारात असलेले सर्व काही करण्याचा उत्तरवादी चा सतत प्रयत्न उघड झालाआहे.अशा प्रकारचे वर्तन, आमच्या मते, तीव्र निषेधास पात्र आहे.उत्तरवादीने आमचे लक्ष इन रे थॉमस जेम्स वॉलेस (१८६६)एल.आर.१पी.सी.२८३ या प्रकरणाकडे वेधले आहे, ज्याचे अनुसरण इन रे ॲडव्होकेट

ऑफ बनारस (ए.आय.आर.१९३२ऑल ४९२) मध्ये करण्यात आले होते.आम्हाला असे वाटत नाही की, प्रिव्ही कौन्सिलचा कायद्याचा कोणताही निश्चित आणि कठोर नियम ठरवण्याचा हेतू होता किंवा त्या प्रकरणातील परिस्थितीत, तो वाजवी, समाधानकारक आणि सोयीस्कर मानला जाणारा मार्ग दर्शविण्या शिवाय आणखी काही केले आणि अलाहाबाद प्रकरणाने त्याचे पालन केले.मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने मुंबईचे महाधिवक्ता विरुद्ध तीन अधिवक्ता (१९३४) आय.एल.आर.५९बॉम्बे ५७. या खटल्यात म्हटल्याप्रमाणे, भारतीय विधीमंडळाने भारतीय बार कौन्सिल कायद्याच्या कलम १० मधील "व्यावसायिक किंवा इतर चुकीची वर्तणुक" या शब्दांचा वापर करून, गैरवर्तनाच्या सर्व प्रकरणांमध्ये, मग ते व्यावसायिक असोत किंवा इतर क्षमतेत असोत, मात्र योग्य प्रकरणांत मध्ये कारवाई करणे, हे न्यायालयाच्या विवेकबुद्धीवर सोडून, न्यायालयाला शिस्तभंगाचे सर्व अधिकार प्रदान करण्याचा हेतू स्पष्ट होतो.अशाच प्रकारचा निर्णय कलकत्ता उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठाने एका वकीलांचे प्रकरणात दिला आहे. (१९३६)आय.एल.आर.६३कल.८६७ इन रि अ प्लीडर (आय.एल.आर.(१९४३)मद्रास४५९) या वकिलांच्या खटल्यातील संबंधित वकीलांचे न्यायालयातील घोषणाबाजी चे वर्तन तर वकीलासारखे नव्हते तथापि, कायदेविषयक व्यावसायिक कायद्याच्या कलम १३(एफ) अंतर्गत त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती. वॉलेसचा खटला (वर नमूद केलेला) हा कायदेविषयक व्यावसायिक कायदा किंवा बार कौन्सिल कायदा यासारख्या कोणत्याही वैधानिक तरतुदीवरील निर्णय नव्हता. वर नमूद केलेली कारणमिंमासा आणि अवती भवती ची परिस्थिती लक्षात घेता, वकिलांच्या वर्तनाच्या दृष्टीने आमचे स्पष्टपणे मत आहे की, वकीलाची वर्तणुक, तो ज्या सन्माननीय व्यवसायाचा भाग आहे त्या प्रतिष्ठित व्यवसायाचा विचार करता, असा सदस्य अयोग्य वर्तनात गुंतलेला असल्यामुळे, त्याला काही काळासाठी व्यवसायातून निलंबित केले पाहिजे.या

न्यायालयाचा तो वकील आहे आणि या न्यायालयाच्या बहुमताने घेतलेल्या निर्णयानुसार, सर्वोच्च न्यायालय अॅडव्होकेट्व (उच्च न्यायालयांमध्ये प्रॅक्टीस) कायद्यांतर्गत, संपूर्ण भारत संघराज्यातील सर्व न्यायालयांमध्ये त्यांचा व्यवसाय चालवण्याचा त्यांना अधिकार आहे.मुंबई उच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठी कोणतेही निलंबन स्पष्टपणे गंभीर विसंगती निर्माण करेल आणि गैरसोयीला कारणीभूत ठरेल.त्यानुसार आम्ही निर्देश देतो की संबंधीत वकीलास, मुंबई उच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या निलंबनाच्या कालावधीसह, म्हणजे १३ ऑक्टोबर १९५६ पर्यंतच्या कालावधीसाठी वकीलीच्या व्यवसायातून निलंबित केले जावे.

--

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारांस त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही.तसेच,इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.